अंकुश सावसाकडे यांच्या निधनाने जनतेच्या हाकेला तत्परतेने ओ देणारा कार्यक्षम, कार्यतत्पर नगरसेवक हरपला

एम.ई.एल. प्रभाग क्र. ३ चे नगरसेवक अंकुश सावसाकडे यांनी कोरोनाच्या पहिल्या लाटेत त्यांच्या प्रभागात जे सेवाकार्य केले त्याला तोड नाही. लॉकडाउन दरम्यान प्रतिबंधीत क्षेत्रात धान्यकीट, जेवणाचे डबे आणि सहाय पुरविण्यात ते अग्रेसर होते. त्यांच्या प्रभागातील विकासकामांसाठी निधी खेचून आणण्यात ते अग्रेसर राहायचे. झोन सभापती म्हणून सुध्दा त्यांनी अल्पावधीत उल्लेखनिय कामगीरी केली. तळमळीने कार्य करणारा लोकाग्रणी नगरसेवक भारतीय जनता पार्टीने गमावल्याचे दुःख आहे . भारतीय जनता पार्टी त्यांच्या परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. या दुःखातुन सावरण्याचे बळ परमेश्वर त्यांच्या कुटुंबीयांना देवो .